दै. लोकसत्ता सोमवार, दिनांक - 7 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे अवकाश केंद्र आता इस्रोच्या नकाशावर

## अवकाश संशोधन केंद्रात संदेशवहनाची यंत्रणा कार्यान्वित

प्रतिनिधी, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठाच्या** पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रात भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्रो) इंडियन रिजनल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम (आय.आर.एन.एस.एस.) या उपग्रह कार्यक्रमांतर्गत एक संदेशवहन यंत्रणा बसविण्यात आली आहे. त्याच्यामार्फत अत्यंत उत्तम पद्धतीने संदेश (सिग्नल) ग्रहण केले जात आहेत. या रिसिव्हरमुळे शिवाजी विद्यापीठाचे अवकाश केंद्र इस्रोच्या नकाशावर दाखल झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाने पन्हाळा येथे अवकाश संशोधन केंद्राची उभारणी केली आहे. पन्हाळा समुद्रसपाटीपासून ९६८ मीटर इतक्या उंचीवर असल्याने कोल्हापूर शहरापेक्षा येथे आकाश सहा



पटीने निरभ्र आढळते. अवकाश निरीक्षणाबरोबरच या क्षेत्राशी निगडित विविध प्रकारचे संशोधन या ठिकाणाहून करण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे. त्यानुसार या केंद्राच्या ठिकाणी भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्रो) इंडियन रिजनल नेव्हीगेशन सॅटेलाइट सिस्टीम (आय.आर.एन.एस.एस.) या उपग्रह कार्यक्रमांतर्गत शनिवारी एक संदेशवहन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. याद्वारे तातडीने सिग्नल ग्रहण करण्यास सुरुवातही केली.

इस्रोच्या आय.आर.एन.एस.एस. या उपग्रह कार्यक्रमांतर्गत सात उपग्रह अवकाशात सोडण्यात येणार आहेत. त्यापैकी पाच उपग्रह प्रक्षेपित झाले असून उर्वरित दोनही लवकरच सोडले जाणार आहेत. या सात उपग्रहांच्या साहाय्याने भारत आता स्वतःची स्वतंत्र नेव्हिगेशन प्रणाली बनवित आहे. उपग्रहांकडून येणारे सिग्नल ग्रहण करण्यासाठी देशभरात सुमारे १०५ रिसिव्हर बसविण्यात येत आहेत. त्यापैकी २३वा रिसिव्हर शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रात समन्वयक डॉ. ए.के. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापित करण्यात आला. कॉर्ड कंपनीच्या सिस्टीम इंजिनिअर्समार्फत सर्व प्राथमिक सिग्नल टेस्टिंग करण्यात आले. त्याचप्रमाणे डाटा रेकॉर्डिंगही सुरळीतपणे सुरू झाले.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सदर अवकाश केंद्रास भेट दिली असता आय.आर.एन.एस.एस. मालिकेमधील आतापर्यंत प्रक्षेपित करण्यात आलेल्या पाचही (१-ए ते १-ई) उपग्रहांकडून येणाऱ्या सिग्नलची पातळी या रिसिव्हरमध्ये उत्तमरित्या नोंद होत असल्याचे दिसून आले. या रिसिव्हरमुळे विद्यापीठाचे अवकाश केंद्र इस्रोच्या पर्यायाने भारतीय अवकाश कार्यक्रमाच्या नकाशावर दाखल झाले आहे, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

या केंद्रातून प्राप्त होणारा डाटा हा भारतीय अवकाश कार्यक्रमाच्या दृष्टीने जितका महत्त्वाचा आहे, तितकाच विद्यापीठात अवकाश संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही खूप मोलाचा ठरणार आहे. याद्वारे मिळणाऱ्या माहितीचे वेगवेगळ्या प्रकारे संशोधन, विश्लेषण करून त्यांना अभ्यास करता येणार आहे, अशी माहिती डॉ. शर्मा यांनी या वेळी दिली.

दै. पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सोमवार, दिनांक - 7 MAR 2016

## मानवासाठी श्वासाइतकेच शिक्षण महत्त्वाचे : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

**इचलकरंजी (प्रतिनिधी) :** समाजाच्या प्रत्येक व्यक्तीचे मन, मनगट आणि मेंदू बळकट करून सामर्थ्य निर्माण करण्यासाठी मानवाच्या श्वासाइतके शिक्षण महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. येथील दे. भ. बाबासाहेब खंजिरे शिक्षण संस्थेच्या नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्समध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे होते. प्राचार्य डॉ. पी. डी. नारे यांनी स्वागत केले. यावेळी श्रीमती अरुंधती खंजिरे, बाळासाहेब मुरदंडे, प्रदीप गोलंगडे, शेखर पाटील, शशांक बावचकर, शंकर आदर्श, डॉ. डी. सी. पाटील, आदींसह पदाधिकारी, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. एम. आर. दांडेकर यांनी सूत्रसंचालन केले. अरुण खंजिरे यांनी आभार मानले.

दै. पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सोमवार, दिनांक - 7 MAR 2016

## समाजशास्त्र अधिविभाग व सेंटर फॉर सोशल स्टडीजमध्ये सामंजस्य करार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अधिविभाग आणि सुरत येथील सेंटर फॉर सोशल स्टडीज यांच्यामध्ये कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सामंजस्य करार करण्यात आला. याअंतर्गत फॅकल्टी एक्स्चेंज, सेमिनार, कॉन्फरन्सेसचे संयुक्तपणे आयोजन, संशोधन प्रकल्प, फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम, संयुक्तपणे गेस्ट लेक्चर्सचे आयोजन, ग्रंथालय सुविधा या संदर्भात सहकार्य होणार आहे. या करारावर सेंटरचे संचालक डॉ. सत्यकाम जोशी आणि प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वाक्षरी केली. याप्रसंगी समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आर. बी. पाटील आणि अन्य प्राध्यापक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. पुढारी सोमवार, दिनांक - 7 MAR 2016

## उद्याने आदर्श मार्गदर्शक : कुलगुरू डॉ. शिंदे

### वनस्पतीशास्त्र अधिविभागात 'उद्यान व विज्ञान' वर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रत्येक मनुष्यात विचारांचे वैविध्यपूर्ण उद्यान असते. त्या विचारांचे प्रयत्नपूर्वक ज्ञानात रूपांतर करून कृतिशीलपणे ते प्रत्यक्षात आणले पाहिजे. उद्याने आदर्श मार्गदर्शक ठरू शकतात, वेगवेगळ्या समाजांतील प्रश्नांना उद्याने समर्पक उत्तरे देऊ शकतात, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ वनस्पतीशास्त्र अधिविभाग, गार्डन्स क्लब, इंडियन वूमन सायंटिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने व सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने 'उद्यान आणि विज्ञान' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या निलांबरी सभागृहात कार्यशाळा झाली. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, प्रत्येक क्षेत्रामध्ये विज्ञान आहे. लिड बॉटॅनिकल गार्डनच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठासारखे मोठे मंच उपलब्ध झाले आहे. त्यामुळे मुलांना काही क्षण निसर्गाच्या सान्निध्यात राहून जैवविविधतेची माहिती घेणे शक्य झाले आहे.

यावेळी सामाजिक वनीकरण उपसंचालक टी. पी. पाटील, डॉ. मंजूषा देशपांडे, विजयसिंह सावंत व डॉ. एस. आर. यादव यांनी मार्गदर्शन केले. कोल्हापूर विभागातील चार तारांकित शाळांचा, चार ग्रीन सोल्जर्सचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. जिल्ह्यातील ५० निवडक शाळांतील हरित सेना, विद्यार्थी व शिक्षक अशा २०० जणांनी सहभाग घेतला. पर्यावरण समस्येवर मात करण्यासाठी अनेक उपायांची जगभर होणारी चर्चा व वैज्ञानिक हरित प्रयोग यांची व्याख्यानात चर्चा झाली. यावेळी शौमिका महाडिक उपस्थित होत्या. प्रास्ताविक डॉ. धनश्री पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे समन्वयन इंडियन वूमन सायंटिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षा कल्पना सावंत यांनी केले.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. तरुण भारत सोमवार दिनांक - 7 MAR 2016

# जाणिवा जिवंत ठेवल्यास जाती निर्मूलन शक्य

प्रतिनिधी

कोल्हापूर

स्वातंत्र्याला साठ वर्षे पूर्ण झाली, मात्र भारतीय समाज अजूनही जातीच्या विचारधारेतून बाहेर पडत नाही. याची खंत वाटते, विज्ञानामध्ये दोनच ब्लड जाती सांगितल्या आहेत. असे सांगत घरातून पहिल्यांदा जात बाहेर गेली पाहिजे. त्यासाठी जणिवा जिवंत ठेवाव्या लागतील; असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉं देवानंद शिंदे यांनी केले.

डॉ. दीघांत कराडे यांनी संपादित केलेल्या कास्ट डिस्क्रीमेशन व कास्ट बेस एक्सक्लुजन या दोन पुस्तकांच्या प्रकाशन प्रसंगी डॉ. देवानंद शिंदे बोलत होते.

कार्यक्रमास डॉ. उत्तमराव भोईटे, डॉ. प्रल्हाद जोगदंड, डॉ. हरीष भालेराव, प्रा. अंबपकर, एस. एन. पवार, डॉ. आर. बी. पाटील, प्रा. कांबळे प्रमुख उपस्थित होते.

**कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचा विश्वास**

डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, आईमुळे मुलं कतृत्ववान होतात. जातीचे संस्कारही घरातूनच होत असतात. मुलं अनुकरण प्रिय असताता घरातील चालीरीतीचां त्यांच्यावर परिणाम होत असतो. जातीचे संस्कार घरातूनच पेरले जातात. यासाठी घरातूनच जात पहिल्यांदा बाहेर काढली पाहीजे, असे सांगत डॉ. देवानंद शिंदे यानी जातीची उत्पत्ती कशी झाली हे विज्ञानातील उदाहरणे देऊन स्पष्ट केले. डॉ. शिंदे म्हणाले, विज्ञानामध्ये स्त्री व पुरूष या दोनच ब्लड जाती सांगितल्या आहेत. भारतीय समाज दोन जीनवर तयार झाला आहे. ४५०० वर्षांपूर्वी भारतात दोन जीन मिसळण्यात आले. याची उत्पत्ती वाढत सतराशे ते एकोणीशे या काळात वैदिक पद्धतीचा उगम झाला, येथूनच खऱ्या अर्थाने जातींच्या जाती तयार होत गेल्या. श्रेष्ठत्वातून तयार झालेल्या जातींची आजची ७० वी पीढी आहे. माणसाच्या मृत्यूनंतरही जात पाठ सोडत नाही. जाती निर्मूलनासाठी घरापासून सुरवात झाली पाहीजे. आंतरजातीय विवाह हा एक पर्याय आहे. तो स्वीकारावा असे आवाहन केले. एक ध्वज एक संविधान, एक घटना यांचा स्वीकार केल्यास जातीच्या भिंती निघून जातील असे शेवटी सांगितले. स्वागत प्रास्ताविक प्रा. अंबपकर यांनी केले. डॉ. हरीष भालेराव यांनी पुस्तकांतील आशयाची मांडणी केली.

The Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Monday. - 7 MAR 2016

# SUK observatory gets ISRO receiver

**Piyush.Bhusari**
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) procured a satellite signal receiver on Friday under the Indian Regional Navigation Satellite System (IRNSS) programme. The receiver has been installed at the university's space observatory at Panhala, around 20km away from the campus.

University vice-chancellor Devanand Shinde visited the observatory on Saturday and said that primary tests on the receiver have been undertaken.

Shinde added that the installation has given the university a significant place in the Indian Space Research Organisation's (ISRO) map.

"The receiver has already started functioning and a few recordings were made on Saturday. This is the beginning of a new era for the university. This space observatory is a very important establishment for the university," he said.

An SUK circular on the IRNSS said that the country is creating its own navigation system for which receivers will play a vital role. "ISRO will install around 105 receivers across the country to get satellite signals from every corner. Of this, the university got the 23rd receiver. The engineering team was present for the receiver testing, which proved successful," it said.


TOI
The ISRO receiver's antenna

The observatory's head, A K Sharma, said that the data from the IRNSS will prove useful for not only to ISRO but for the students as well.

The space observation centre at Panhala is located around 968m above sea level and gives six times clearer sky visibility than what is available on the university campus.

The university officials have already said that the space research centre will also be open to tourists, space enthusiasts and students so that they can learn about astronomy, comets, star, solar eclipses and planetary transitions.